# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ

On the web: www.bmmonline.org

**उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**


नोव्हेंबर २००७
वर्ष २७, अंक ११




**Happy Diwali**

दीपस्फूर्तीने उजळवू घरदार अन् येणारा प्रत्येक क्षण
पण वणव्यासम आपत्तींनी पोळलेल्यांचेही करू स्मरण ।
'एकमेकां सहाय्य करू' ध्यानी ठेवू पारंपरिक शिकवण
सुसह्य करुया परस्परांच्या आयुष्यांतील अवघड वळण ।

संपादक,बृ.महाराष्ट्र वृत्त




**शुभ दीपावली**

## बृ. मंडळ २०२० - काही क्षणचित्रें









अध्यक्ष गिरीश ठकार बृ. मंडळाची उद्दीष्ट्यें सादर करतांना

रिटा फ्रेंचमन, आशिष चौघुले, ललित महाडेश्वर, (logo निर्मिती- अदिती मोहिले, अनुपस्थित)

लीना देवधरे व सूत्र संचालक: संदीप देवकुळे : राष्ट्रीय स्तरावर मराठी वर्ग: चर्चासत्र आयोजन




किरण जोगळेकर



बृ मंडळ २००९ अधिवेशनाचे आमंत्रणपर भाषणप्रसंगी संयोजक श्री मुकुंद कुटे

किशोर पाठारे



Working together with local mandals : चर्चासत्रात सहभागी:





डावीकडून प्रसाद सातघरे (रॅले, नॉर्थ कॅरोलायना), सुनील नाईक (न्यूयॉर्क), डॉ.आश्लेषा चौघुले (डेलावेअर, होकेसिन), संदीप देवकुळे (सॅन होसे, कॅलिफोर्निया), अमरेश देशपांडे (शिका गो), दिलीप थत्ते (शिकागो), केदार गिध (फिलाडेल्फिया)

## बृ.मंडळ २०२० - काही क्षणचित्रें




▲ डावीकडून: तेजस नेरुरकर (फिलाडेल्फिया), सुनील ढवळीकर (न्यू जर्सी), गिरीश गोडबोले ( पिट्सबर्ग, पेन्सिल्व्हेनिया)



▲ राष्ट्रीय स्तरावर मराठी वर्ग– चर्चासत्रात सहभाग:
डावीकडून: सुनंदा टुमणे (टोरांटो, कॅनडा), डॉ. विजया बापट (नॉर्थ कॅरोलायना), अस्मिता जोशी (फिलाडेल्फिया)




▲ महाराष्ट्र फौंडेशन अध्यक्ष:
सुनीता धुमाळे (कनेक्टिकट)



▲ बृहन्महाराष्ट्र वृत्त संपादक:
डॉ. विनता कुलकर्णी




▲ अरुण हर्डीकर



▲ बृ.मंडळ सल्लागार समिती सदस्य
मोहन रानडे with BMM Collectives

# अध्यक्षीय

नमस्कार बंधुभगिनींनो,

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे "बृ.मंडळ –२०२०" ही पूर्व नियोजित शिखर परिषद ऑक्टोबर १३ आणि १४ तारखेस फिलाडेल्फियात भरविण्यात आली. संस्थेने आतापर्यंत केलेल्या वाटचालीचा आढावा घेऊन पुढील दशकामध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाचे कार्य आणि कार्याची दिशा काय असावी हा या शिखर परिषदेमागील उद्देश होता. आतापर्यंत झालेल्या अधिवेशनांचे संयोजक, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे माजी अध्यक्ष, कार्यकर्ते, आणि महाराष्ट्र मंडळांचे अध्यक्ष तसेच बृ.मंडळ प्रतिनिधी यांच्यातील वैचारिक देवाण–घेवाण अधिक बळकट व्हावी यासाठी या सर्वांना निमंत्रण देण्यात आले होते.

मंडळाच्या इतिहासात प्रथमच भरलेल्या या परिषदेत मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दोन नवीन उपक्रमांचेही उद्घाटन झाले. १) मराठी उद्योजकांना एकत्र आणण्यासाठी North American Marathi Entrepreneurs (NAME); आणि २) राष्ट्रीय स्तरावर "बालविहार" कार्यक्रमाची सुरूवात. सर्व आमंत्रितांपैकी मोजकेच मंडळ अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते ही बाब विचार करण्यासारखी असली तरी ही दोन दिवसांची परिषद बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पुढील वाटचालीस निश्चितच लाभदायक ठरेल अशी खात्री वाटते. बृ.मंडळ – २०२० परिषदेस उपस्थितांच्या प्रतिक्रिया (पृष्ट ३) याचीच ग्वाही देत आहेत. आपणासर्वांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

**गिरीश ठकार**
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ
*gsthakar@gmail.com*

अंकाचे वाचक, लेखक, हितचिंतक व जाहिरातदारांना
**दीपावली निमित्त शुभेच्छा!**
ह्या वृत्तपत्रासाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या मदत करणाऱ्यांचे मन:पूर्वक आभार !

## या अंकात ...

बृ.मंडळ २०२०– प्रतिक्रीया ३
मराठी मंडळांतून फेरफटका , ४
फिलाडेल्फिया अधिवेशन वृत्तांत,
आवाहन
व्यक्ती परिचय: वासंती परांजपे ५
वाचकांच्या प्रतिक्रिया , ६
लाख मोलाची दिवाळी
जावईबापू ७
कविता: ईश्वराचे कोडे, सप्तसूर ८
एकोऽ हं ९
उत्तररंग
शेवटचे पान १०

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्रमंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक**
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी

**सहाय्यक संपादक:** वसुधा पटवर्धन

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, लीना देवधरे

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-800-300-6430 (EST)
E-mail: editorbmm@yahoo.com

**वर्गणीचे दर**

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक: | $ 21 | $ 26 | $ 41 |
| द्वैवार्षिक: | $ 40 | $ 50 | $ 80 |
| आजीव: | $250 | $350 | $375 |

**जाहिरातीचे दर**

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान: | $155 | $220 |
| अर्धे पान: | $ 85 | $115 |
| पाव पान: | $ 50 | $ 70 |
| अष्टमांश पान: | $ 35 | $ 40 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही
- लिखाणाच्या निवडीचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतीम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल

**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी (२००७-२००९)**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:** | गिरीश ठकार, | पिट्सबर्ग, पेन्सिल्व्हेनिया |
| **कार्यवाह:** | संदीप देवकुळे, | सॅन होसे, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:** | आशिष चौघुले, | होकेसिन, डेलावेअर |
| **सभासद:** | लीना देवधरे, | टोरांटो, कॅनडा |
| | रिटा फ्रेंचमन, | नॅशव्हिल, टेनेसी |
| | किरण जोगळेकर, | फिलाडेल्फिया |
| | ललित महाडेश्वर, | रॅले नॉर्थ कॅरोलायना |
| | किशोर पाठारे, | ओर्‌लँडो, फ्लोरिडा |

**माजी अध्यक्ष:** जगदीश वासुदेव, प्रिन्सटन, न्यू जर्सी
**सल्लागार:** श्री ठाणेदार,सेंट लुईस, विद्या हर्डीकर सप्रे, लॉस एंजेलिस, मोहन रानडे, फिलाडेल्फिया
**MAIYTRA:** मैत्र प्रतिनिधी: नितिन सालकडे, फिलाडेल्फिया
**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्रमंडळ, उत्तर अमेरिका
196, Bryna Lane, Carnegie, PA 15106
gsthakar@gmail.com
www.bmmonline.org

# बृ.मंडळ २०२० काही प्रतिक्रिया

Myself and my sister Monika had a great time and we learnt a lot also!

Amresh Deshpande ,Chicago,
amresh.deshpande@gmail.com

***

I thought the event was very well planned, the timing and agenda for each activity were appropriately chosen and the topics discussed were very interesting and informative. Few takeaways for me were:

- Being aware of BMM's activities and goals
- Knowledge of Marathi Schools operations across various mandals
- Marathi Entrepreneur's efforts to support each other
- Maharashtra Foundation's activities and help needed to promote these to all of our members
- New ideas with regards to use of technology in mandal's operations
- Strategy for BMM 2009 convention and need for mandal's participation & assistance for this effort

I think it is now our responsibility to make sure that each of these activities is promoted to our members well.

I hope to have more gatherings like these at various locations across the country and hope that more Mandal representatives attend in future.

Anirudha Kinare, Maharashtra Mandal, NY
anirudha@kinare.com

***

My sincere compliments to the current EC for your effort to get all the Mandals involved in the planning of BMM activities. To my knowledge, this is the first time such an event has taken place. The objectives as outlined are commendable and ambitious.

Dileep Thatte, Naperville, IL
dvthatte@yahoo.com

***

Event was very well planned and executed. Hope the spirit and energy will continue.

Sunil Naik , New York
sonianaik2002@yahoo.com

**अंकासाठी साहित्य पाठविण्याचा पत्ता**

**For sending electronic copy - Email :**
vinata@gmail.com
Or
vasudhapatwardhan@yahoo.com

**For sending paper copy :**
Vinata Kulkarni
1489 Heritage Way, # 23,
Oakville ON L6M 4M6 Canada
Or
Vasudha Patwardhan
4708, Touchstone ter Fremont, CA, 94555

# मराठी मंडळांतून फेरफटका

## पिट्सबर्गची कोजागरी: नव्या जुन्याचा सुरेल संगम

पिट्सबर्गच्या मराठी मंडळाने आयोजित केलेला कोजागरीचा कार्यक्रम शनिवार दि. १३ ऑक्टोबर रोजी मरिसव्हील् कम्युनिटी सेंटर मधे सुमारे १७० मराठी भाषिकांच्या उपस्थितीत साजरा झाला. कार्यक्रमाचं एक प्रमुख आकर्षण म्हणजे सौ. प्रिती परांजपे यांनी तयार केलेला अंताक्षरींचा कार्यक्रम. सौ. अनघा मनोहर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

ह्या कार्यक्रमात सुमारे ८–१०जणांच्या पाच गटांनी भाग घेतला. प्रत्येक गटात दहाबारा वर्षांच्या मुलामुलींपासून आजी,आजोबांपर्यंत विविध वयाच्या लोकांचा सहभाग होता. पाच फेऱ्यांमधे झालेल्या या अंताक्षरीत प्रत्येक फेरीचे नियम वेगवेगळे होते. उदा. एका फेरीत प्रत्येक गटाने चिठ्ठा काढून त्यात जो शब्द लिहिलेला असेल तो शब्द धृपदात असेल असं गाणं वीस सेकंदाच्या आत गाउन दाखवायचं! दुसऱ्या फेरीमधे प्रसंग दिलेले होते. उदा. रक्षाबंधन, बिदाई, बालगीत, इ. नव्या, जुन्या हिंदी, मराठी गीतांचा हा कार्यक्रम तासभर रंगला.

कानात रुंजी घालणारी अवीट गोडीची गाणी, खाद्यपदार्थांची मेजवानी, मित्र–मैत्रिणींबरोबर मारलेल्या गप्पा ह्यांनी तृप्त होऊन आल्हाददायक हवेत कार्यक्रमाची सांगता झाली.

**डॉ. प्रियदर्शन मनोहर**

### पिट्सबर्गच्या डॉ. मनोहर जोशी यांचे निधन :

२४ ऑक्टोबर रोजी पिट्सबर्गचे रहिवासी व समाजवादी नेते कै. नानासाहेब गोरे यांचे जावई डॉ. मनोहर जोशी यांचे निधन झाले. पिट्सबर्ग महाराष्ट्र मंडळाचे ते अनेक वर्ष कार्यकर्ते होते. तसेच बृ. मंडळाच्या कार्यकारिणीचे ते दोन वर्ष सदस्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी शुभदा, कन्या जुई, सायली, जावई राजीव मूर्ती व नातवंडे असा परिवार आहे.

### आवाहन: काळाच्या प्रवाहाबरोबर बदलण्याचा विचार

बृहन्महाराष्ट्र मासिक वृत्त www.bmmonline.org वर टाकल्यास आपणांस लाभदायक होईल का? या संबंधी आपले विचार बृ. मंडळ– २००७–०९ ची कार्यकारिणी जाणूं इच्छिते.

त्यासाठी खालील माहिती गोळा करण्याचे व आपला प्रतिसाद प्रसिध्द करण्याचे बृ. वृत्ताने ठरविले आहे.

वृत्ताची प्रत फक्त Internet Online- electronic स्वरूपात उपलब्ध व्हावी : होय : —— नाही ——

वृत्ताची प्रत फक्त Paper स्वरूपात उपलब्ध व्हावी : होय : —— नाही ——

वृत्ताची प्रत वरील दोन्ही स्वरूपात उपलब्ध व्हावी: होय : —— नाही ——

कृपया वरील माहिती भरून ldeodhare @gmail.com अथवा vinata@gmail.com ईमेल वर पाठवावी

**लीना देवधरे** बृ. मंडळ कार्यकारिणी सदस्य २००७–९

# फिलाडेल्फिया अधिवेशन वृत्तांत

फिलाडेल्फियाचे कार्यकर्ते २००९ च्या अधिवेशनाच्या कामाला चांगलेच लागले असून १४ ऑक्टोबरला त्यांनी बृ.मंडळाच्या २०२० शिखर परिषदेच्या निमित्ताने फिलाडेल्फिया येथील पेन्सिल्व्हेनिया कन्व्हेंशन सेंटरची भेट आयोजित केली होती. या भेटीचा लाभ बृ. मंडळाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी घेतला व आपण सर्वांची सुंदर व्यवस्था करू शकू असा विश्वास जागृत झाला. या भेटी आधी, येथील फोर्ट वॉशिंग्टनच्या पॅलेस ऑफ एशिया उपाहारगृहामध्ये झालेल्या बृ.मंडळाच्या २०२० ह्या कार्यक्रमाचा दुसरा दिवस फिलाडेल्फिया अधिवेशनातर्फे प्रायोजित करण्यात आला.

फिलाडेल्फिया अधिवेशनातर्फे सुकाणूसमिती व अमेरिका कार्यक्रम समितीच्या पदाधिकारींच्या हस्ते बृ. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उपस्थित मराठी मंडळाचे अध्यक्ष व प्रतिनिधी या सर्वांचा शाल देवून सत्कार करण्यात आला. अधिवेशनाचे संयोजक श्री. मुकुंद कुटे यांनी उपस्थितांसमोर अधिवेशनाच्या वेगवेगळ्या आघाड्यांवर सुरू असलेल्या तयारीचा आलेख मांडला व लवकरच सर्व समित्यांची घोषणा होऊन कामे सुरू होतील असा विश्वास दिला.

***

## सॅन फ्रान्सिस्कोच्या रहिवाशी आश्विनी भावे निर्मित चित्रपट 'कदाचित' प्रदर्शित

प्रसिध्द अभिनेत्री आश्विनी भावे निर्मित नविन चित्रपट 'कदाचित' लवकरच उत्तर अमेरिकेतील रसिकांना बघायला मिळणार आहे. पुण्यात हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. चित्रपटास गिरीश जोशी यांची कथा, प्रशांत दळवी यांचे संवाद व चंद्रकांत कुलकर्णी यांचे दिग्दर्शन आहे. तसेच आश्विनी भावे, सचिन खेडेकर, सदाशिव अमरापूरकर, तुषार दळवी यांच्या प्रमुख भूमिका असून निळू फुले व गिरीश जोशी हे पाहुणे कलाकार म्हणून चमकले आहेत. काही वर्षापूर्वी विवाहानंतर आश्विनी भावे सॅन फ्रान्सिस्कोच्या रहिवाशी झाल्या आहेत .

### Grand Opening of Soham Dance Space in Chicago



Anjal Chande of Chicago, IL, an accomplished dancer, teacher, and choreographer, opened in September 'Soham Dance Space', which offers Bharatnatyam Dance Classes for all ages, levels and background . She has performed nationally and internationally at prominent venues, receiving critical acclaim and many scholarships and awards. As founder and director of Soham Dance Space, Anjal aims to share the rich form of Bharatanatyam with focus on integrity and innovation. Born in Chicago, Anjal's dance style has local yet universal appeal. Additionally, she has a gift of relating with children as well as students of any age. Anjal is a privileged disciple of renowned Guru Smt. Hema Rajagopalan and is committed to seeing the Indian arts flourish.

# वासंती परांजपे: सात्विक, प्रेरणादायी व्यक्तिमत्व



महाराष्ट्रीयन महिलांनी समाजाची प्रगती करण्यांस अनेक क्षेत्रात हातभार लावला आहे. वासंती भालचंद्र परांजपे, एडमंटन अल्बर्टा, कॅनडा ही अशीच एक व्यक्ती आहे. त्यांचे विनम्र व अष्टपैलू व्यक्तीमत्व कनेडीयन व हिंदुस्थानी समाजाला विकासाप्रत नेणारे झाले आहे असे गौरवाने म्हणता येईल.

एक अचंबा वाटावा अशी आघाडी: वयाच्या पंचाहत्तरीनंतर अल्बर्टा विद्यापीठात *Ethno-musicology* विभागाच्या *Director,* व हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत विषयाच्या प्राध्यापिका अशा दोनही जबाबदाऱ्या अप्रतिम रितीने पार पाडून विद्यार्थी व सहकारी यांच्यात वासंतीताई आवडत्या झाल्या. वयाच्या ८०व्या वर्षी त्यांचा आवाज सुमधुर, सुरेल खुला, मृदु पण भरघोस व भारदस्त असून, श्रोतृवर्गाला नादधुंदीत तल्लीन करणारा आहे. नुकताच २००६ मधे *Guelph* विद्यापीठात त्यांनी गाण्याचा २ तासांचा दणदणीत कार्यक्रम केला.

अल्बर्टा विद्यापीठात शिकवतांना भारतीयांशिवाय कनेडिअन व इतर देशाच्या विद्यार्थ्यांना आपले संगीत कसे कळेल व आत्मसात करता येईल याचा सांगोपांग विचार करून गेल्या ३ वर्षात त्यांनी "नादतरंग" – क्रमांक १,२ अशी दोन पुस्तके व त्यातील गाण्याच्या दोन सीडीज् केल्या आहेत. ही पुस्तके विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमातही समाविष्ट आहेत. पुस्तकांत दहा राग, त्या रागांची व हिंदुस्थानी संगीत पध्दतीची शास्त्रीय व मूलभूत माहिती, प्रत्येक रागात दोन गाणी भारतीय व पाश्चिमात्य नोटेशन्स सह दिलेली आहेत. एडमंटनच्या '*Lattitude 53*' ह्या *Art Club* मध्ये सर्वप्रकारची भारतीय संगीत वाद्ये वाजवणारी मंडळी गोळा करून २ तासांच्या अप्रतिम कार्यक्रमात, एक ऑर्केस्ट्रा व एक ठुमरी स्वत: म्हणून त्यांत हिंदुस्थानी वाद्यांचा व गाण्याचा आवाज, रागाचे आलाप व ताल यातील वैविध्य त्यांनी पाश्चिमात्य लोकांना दाखविले.

संगीत क्षेत्रातील सामाजिक वैशिष्ट्यपूर्ण सहयोग: एडमंटन येथे संगीताचे खाजगी-वर्ग, एडमंटनच्या '*रागमाला सोसायटी*' तर्फे आयोजित अनेक संगीत कार्यक्रमात सहभाग तसेच पंडित जसराज, जितेंद्र अभिषेकी, प्रभा अत्रे अशा नावाजलेल्या कलाकारांच्या गायनात ऐनवेळी त्यांनी हार्मोनियमची उत्तम साथ दिली. *Ethno-musicology* विभागातर्फे सुप्रसिध्द सृजनखान ह्यांचे बरोबर वासंतीताईंचे सुश्राव्य गायन झाले. तसेच '*Indian Music and Hinduism, its Origin and Practices*' ह्या विषयावर त्यांची मार्मिक व्याख्याने झाली. विशेष म्हणजे एडमंटनला त्यांनी एक अभिनव भजनी मंडळ चालू केले. त्यांत भारतातील विविधप्रांतीय, विविध भाषिक(मराठी हिंदी, पंजाबी, बंगाली, तामिळ, तेलगू मल्याळम् उर्दू, इंग्रजी), व विविध धर्म/ पंथाचे (हिंदू, शीख, मुस्लीम, ख्रिश्चन) लोकांनी एकत्रित जमून व भजने गाऊन विविध संतांची ओळख व भजनांचाा अर्थ सांगितला.

अकोण्यास सकाळी ५ वाजतां ब्राह्मी मुहुर्तावर तुलसीरामाचे दोहे, गीतेतील श्लोक चाली लावून म्हणणे हा बापूसाहेब सोहोनी ह्यांच्या घरचा परिपाठ होता. त्या वातावरणातून वासंतीताईंचा (पूर्वाश्रमीच्या वत्सला सोहोनी) आवाज परममधुर झाला असावा. बनारस हिंदू विद्यापीठातून विज्ञानाच्या विद्यार्थिनी, व पुणे विद्यापीठातून कायद्याची पदवी संपादन करून अकोण्यास सनद काढून आपल्या वडिलांच्या हाताखाली त्या काम करू लागल्या. वासंतीताईंचे लग्न ही वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे. त्यांचे भावी पती भालचंद्र विश्वनाथ परांजपे हे लिव्हरपूर (इंग्लंड ) येथे *Physics* विषयात *Ph.D* करत असतांना त्यांची 'film' वत्सला/वासंतीच्या कुटुंबियांनी पाहिली. व लिव्हरपूरला वत्सलेचा फोटो पाठविण्यात आला. लग्नाच्या आदल्या दिवशी परांजपे हिंदुस्थानात येऊन दुसरे दिवशी त्यांचे 'शुभमंगल' सावधान झाले. आज त्यांचा सुखासमाधानाचा संसारास ५३ वर्षे झाली. व त्यांची तीनही मुले सुविद्य असून विविध विद्यापीठात प्राध्यापक आहेत.

वासंतीताईंनी १९७० मधे अल्बर्टा विद्यापीठांतून *Masters in Sociology* केलं. नंतर *Criminology Journal* मधे तीन महत्त्वाचे लेख, *Juvenial Courts* चे कामाबद्दल संशोधन व *Women in Canada* वर संशोधन केलं. ज्याबद्दल त्यांना एडमंटनच्या मेअर हस्ते "*Best Social Worker*" म्हणून प्रशस्ती पत्रक दिल्या गेले. एडमंटनच्या '*Folkway Alive*' संस्थेत जगातील अनेक लोकांचे संगीत रेकॉर्ड केले आहे त्यात दक्षिण आशियाई संगीताच्या- प्रतिनिधी म्हणून वासंतीताईंना बहुमान मिळाला आहे.

विदर्भातील पूर्वीच्या बॅडमिंटनच्या चॅम्पियन, जात्यावर दळणें, विणकाम, चित्रकला, रोईंग, टेनिस, पोहणें यात रममाण होणाऱ्या वासंतीताई परांजपे यांनी सुगृहिणी म्हणून आपले कर्तव्य सांभाळून संगीतक्षेत्र व सामजिक कार्यक्रमांतून भारताचा सन्मान वाढविण्यास मोलाचा सहभाग दिला आहे.

**डॉ .सविता प्र. जोशी** , Lake Bluff, IL
*joshipps@hotmail.com*

# वाचकांच्या प्रतिक्रिया

Dear Editor BMM,

This is in response to Dr.Borgaonkar's book review in the September issue on the book written by James W. Lane on Shivaji. I too have read this book recently and, coincidentally, come from Hyderabad as Dr. Borgaonkar does and I have many Muslim friends like he has. However, my reaction to Lane's book is different.

First of all, I found that Lane is not prejudiced and has worked and studied the subject thoroughly, including personally meeting Babasaheb Purandare and others. He also spent considerable time studying old manuscripts in the Bhandarkar library in Pune. It is very unfortunate that some misdirected protesters, most of whom never read Lane's book, damaged the precious books in that library.

Lane never denigrated Shivaji. On the contrary, he gives him credit as an able general and a military strategist who founded the Hindu kingdom at a time when most of India was ruled by the Hindu hater and tyrant Auranzeb. This mughal king had desecrated the holy Vishwanath temple in Varanashi by building a mosque in its premises and had levied the jiziya tax on all Hindus. But for Shivaji, the Hindu religion would have been further damaged. Lane, however contends that Shivaji did not found the Maratha empire to prevent the Muslim onslaught but that he was an ambitious person, who wanted to become an independent king. It is this statement of Lane that infuriated the protesters across Maharashtra.

Whatever may have been the original motivation of Shivaji, Lane clearly writes that Shivaji met Samarth Ramdas and became his disciple and was ordained by Ramdas Swami to protect the Hindu religion. There is nothing wrong and nothing anti Muslim when subsequent historians credit Shivaji, as Lane writes, for defending the Hindu religion against Muslim tyrant kings in the seventeenth century. I wish that there were more Shivajis in the times of Altamash( the cruel king from the slave dynasty), Allauddin Khilji and the Mughal king Babar.

Lastly, I urge the readers to read the book (a short one) and come to their own conclusions. I am glad that Lane did the hard work to shed more light on the illustrious career of the great Shivaji Maharaj.

**Colonel Narayan Deshmukh**
coloneldeshmukh@yahoo.com

***

It is always a pleasure to read " Shevatache Paan" and we look forward to know what would be the subject next time?

**Sunanda Kandalgaonkar**
zzsuzan@hotmail.com

***

Enjoyed "Shevatche Paan" (in October Vrutt). ... It is right on the 'mark'. I had always wondered how our postmans deliver our mail without ever making a mistake (they have to be the most intelligent people.)

**Prakash Waghmare**
*waghmare2@gmail.com*

# लाखमोलाची दिवाळी

मराठी चित्रपटसृष्टीतले प्रसिध्द गीतकार व कवि श्री जगदीश खेबुडकर न चुकता दरवर्षी भाउबीजेला कोल्हापुरला आपली बहीण सौ. लता कालेलकरकडे जातात. (लता ही सौ. प्रिती बसर्गेकर, कॅलिफोर्निया यांची शालेय, महाविद्यालयीन काळांपासूनची मैत्रिण.) काहीतरी भेटवस्तू दिल्याशिवाय अर्थातच् ते रहात नहीत. लता एकदा जगदीश खेबुडकरांना म्हणाली, "नाना दरखेपेला असे काहीतरी घ्यायला आता मी काही लहान राहिले नाही. तू आपला दरखेपेला तुझी एखादी कविता मला भाऊबीजेची भेट म्हणून देत जा. ती अगदी मी माझ्या ह्रुदयाशी जपून ठेवत जाईन." तेव्हापासून नाना आपल्या बहिणीला ज्या कविता ओवाळणीत घालू लागले त्यातील निवडक कविता लता कडून आम्हाला मिळाल्या. आजवर ह्या कोठेही प्रसिध्द झालेल्या नाहीत. त्या प्रसिध्द करण्यास हरकत नसल्याचे श्री खेबुडकरांनी सांगितले.

**अशोक बसर्गेकर,** ऑरेंज, कॅलिफोर्निया

टीप: प्रतिथयश गीतकार श्री जगदीश खेबुडकरांच्या काही अप्रकाशित कविता या अंकात प्रकाशित करीत आहोत. – संपादक बृ.महाराष्ट्र वृत्त

## ओवाळणी

लाख मोलाची दिवाळी, दीपपूजेचा हा सण
किती सुख होतं दुणं, थोडं दु;ख होतं उणं !
लाख मोलाची दिवाळी, लक्ष्मीपूजनाचा थाट
संचिताचं, सुकृताचं, माप भरे काठोकाठ ।
लाख मोलाची दिवाळी, प्रतिपदा की पाडवा
जिवाशिवाला कळावा, मायाब्रह्माचा गोडवा ।
लाख मोलाची दिवाळी, भाउबीज साधीभोळी
आयुष्याच्या तबकांत, ज्योत ज्योतीला ओवाळी ।
लाख मोलाची दिवाळी, जशी येई तशी जाई
अंगणात अंतरात, एक खूण मागे राही ।

**नाना (जगदीश खेबुडकर)** ८ नोव्हेंबर , १९९१

## भाऊबीज

दिवाळी नि भाऊबीज, जुळ्या बहिणी बहिणी
एक संसार सजवी, एक सात्विक गृहिणी ।
दिवाळीच्या अंगणात, भाऊबीज घाली सडा
एकमेका न्याहाळीता, कां ग पाणवल्या कडा ।
भाऊबीजेचा देव्हारा, दिवाळीनं ग पूजला
डोळा आनंदानं टिपून, जरीपदर भिजला ।
दिवाळीच्या तबकात, भाऊबीज नीरांजन
ज्योत भेटली ज्योतीला, एक आत्मा देह दोन ।
भाऊबीजेपुढं भाऊ, डोळं मिटून बसला
ओघळीता मोती तिनं, कुण्या मायेनं पुसला ।
ओवाळणी घालायचं, गेलं विसरून भान
दामदुपटीची ठेव, बंधुप्रेमाचं हे दान!

**नाना (जगदीश खेबुडकर)** २६/१०/२००३ भाऊबीज.

# जावईबापू



डॅरल, मेघना, जस्टिन व मोना

उत्तर अमेरिकेत ६०व्या दशकात येऊन स्थायिक झालेल्या भारतीयांना आपल्या मुला-मुलींची लग्ने इथे स्थायिक झालेल्या इतर भारतीयांच्या मुली-मुलांबरोबर व्हावी ही इच्छा स्वाभाविकच आहे. आम्हीहि, मी व माझी पत्नी - शीला त्याला अपवाद नव्हतो. मात्र मुला-मुलींनी आपापल्या पसंतीने अमेरिकन किंवा इतर देशीय बायको-नवऱ्याची निवड केली असती तरी आमची हरकत नव्हती. जगातील सर्व आई-वडिलांना आपल्या मुलांचे भावी संसार सुखाचे व्हावेत ही एकमेव इच्छा असते!

इथे जन्मलेल्या आमच्या मुलीने - मोनाने सुमारे १३ वर्षापूर्वी तिच्याबरोबर काम करणाऱ्या मुलाला - डॅरलल जेव्हां त्यांच्या लग्नाच्या संमतीसाठी घरी आणले तेव्हां त्या अमेरिकनला जावई म्हणून स्विकारायची आमची तयारी होती...अशी वेळ येण्याची पूर्वकल्पना होती! ह्याचे कारण त्याआधी १९९२ मध्ये कॅलिफोर्नियातील माझा मोठा भाऊ अरविंदच्या मुलीने - मनीषाने टॉम नांवाच्या अमेरिकन मुलाशी लग्न केले होते. मिश्र संस्कृतीच्या जोडप्यांचा दोन्ही पद्धतीने विवाह साजरा होतो. त्याप्रमाणे मोना-डॅरलेचे लग्न कॅथालिक पद्धतीने चर्चमधे तर वैदिक हिंदू पद्धतीने एका हॉलमध्ये सप्टेंबर १९९५ मध्ये झाले. त्या दोघांना घेऊन आम्ही सर्व भारतभेटीसाठी जानेवारी ९७ मध्ये मुंबईला गेलो. माझ्या सासऱ्यांचा-भाऊकाकांचा चार खोल्यांचा प्रशस्त ब्लॉक माहिम भागात आहे. नेहमीप्रमाणे तिथेच उतरायचे ठरविले. मात्र त्यामुळे भाऊकाकांना टेन्शन आले, दोन कारणांनी एक, आपले भात, भाजी, आमटी व चपाती असलेले शाकाहारी जेवण डॅरलला आवडेल कां?; दुसरे, त्याहून त्यांना काळजी पडली दीर्घशंकेची किंवा संडासाची ...त्यांच्याकडे भारतीय पद्धतीचा संडास असल्याने! डॅरलचे मुंबईतील वास्तव्य सुखकर व्हावे ह्या इच्छेने त्याची व मोनाची सोय जवळच्या हॉटेलमध्ये करावी कां अशी त्यांनी विचारणा केली. मोनाने तिच्या लहानपणापासून अनेकवेळा मुंबईला भेट दिली असल्याने तिचा प्रश्न नव्हता. डॅरलशी ह्यासंबंधी बोलल्यावर त्याने हॉटेलची सूचना पहिल्याच फटक्यात फेटाळून लावली. हॉटेलमध्ये राहून फॅमिलीच्या सहवासाला मुकणार ही त्याची तक्रार आम्हालाही पटली. त्या भेटीतील तीन आठवड्याच्या अवधीत, डॅरल आमच्या सारखाच भारतीय जेवणाचा स्वाद घेत होता व कमोडच्या कमतरतेबद्दल त्याने कधीही चकार शब्द काढला नाही. भाऊकाकांकडे सर्वांना बेड्स नसल्याने काहीवेळा तो आमच्याबरोबर जमिनीवर अंथरलेल्या गाद्यांवरही झोपला. डॅरलने कॉलेजजीवनात सियॅटल ते अटलांटिक सिटी हे अंतर लंग कॅन्सर निधीउभारणीसाठी सायकलीने कापले आहे. तसेच त्यानंतर बॅकपॅकिंगकरून युरोपचाही प्रवास केलेला आहे. त्यामुळे माझ्या मते परिस्थितीप्रमाणे जुळवून घेण्याची त्याला सवय जडलेली आहे.

भारतभेटीच्या आधी आम्ही दोघांनी व मोनाने डॅरलला बऱ्याच सूचना देऊन त्याची मानसिक तयारी करून ठेवली होती. त्या म्हणजे: १) घरांत बूट, चपला, स्नीकर्स वापरायचे नाहीत...बाहेर काढून ठेवायचे! २) हाताने जेवणाचा प्रसंग आला तर फक्त उजवा हात वापरायचा. कोणी वाढत नसेल तर वाढून घेण्यासाठी मात्र डावा हात वापरला तरी चालेल. (खरकटे म्हणजे जेवतानाचा उजवा हात व उष्टे म्हणजे डबल डिपिंग हे डॅरलला समजावून सांगायला लागले) ३) वयाने मोठे असलेल्यांचा आदर राखण्यासाठी वाकून नमस्कार करणे.

ह्या पहिल्या भेटीत मोना व डॅरल लग्नानंतर प्रथमच भारतात येत होते. त्या निमित्ताने, त्याची आमच्या सर्व नातेवाईकांची भेट व्हावी ह्या उद्देशाने गेट-टू-गेदरचा समारंभ मुंबईतील एका हॉलमध्ये आयोजित केला होता. त्या समारंभात मोना-डॅरल भोवती नातेवाईकांचा गराडा पडला. त्यावेळी कुणीही भेटवस्तू दिल्यावर लगेच त्यांना वाकून नमस्कार करीत डॅरल सुटला. बहुधा त्या गोंधळात त्याचा समजुतीचा घोटाळा, आमच्या पूर्वसूचनांमुळे झाला असावा हे मी ताडले. म्हणून त्याला बाजूला घेऊन मी समजावून सांगितले की फक्त वयस्कर लोकांना वाकून नमस्कार करणे पण बाकीच्यांना हात जोडून नमस्कार करायला हरकत नसावी.

डॅरलला फोटोग्राफीची खूप आवड आहे. ह्याच भेटीत शीला व मोना दादरला रानडे रोडवर दुकानांत खरेदी करत असता डॅरल फोटो काढण्यासाठी एकटाच फिरत होता. त्यावेळच्या कोहिनूर सिनेमासमोर (आता त्याचा शॉपिंग मॉल झाला आहे) तो फोटो घेत असता तिथल्या एका दुकानदाराने भारतीय पद्धतीनुसार नाव, गाव, इथे कसा, अशा चौकशा करायला सुरूवात केली. डॅरलची उत्तरे ऐकून तो दुकानदार म्हणाला, "एका भारतीय मुलीशी लग्न केल्याने तू आमचा पण जावई आहेस". त्या दुकानदाराने डॅरलला आग्रहाने चहाहि पाजला. ह्या घटनेने सर्वसामान्य (नातेवाईक नसलेल्या) भारतीयांच्या आदरातिथ्याची डॅरलला चांगलीच कल्पना आली व त्याचा उल्लेख तो अधूनमधून करीत असतो.

आतापर्यंत डॅरल तीनवेळा मुंबईला जाऊन आलेला आहे. प्रत्येक भेटीत सकाळी जवळच्या शिवाजी पार्कभोवती जॉगिंगसाठी तो जात असतो. जॉगिंगनंतर कट्‍ट्यावर विश्रांती घेत असता, तिथे क्रिकेटचा सराव करणारी मुले व तरूण, बहुधा त्याच्या गोऱ्या रंगाच्या कुतुहलामुळे त्याच्याभोवती जमतात. (कृपया पृष्ठ ८ पहा)

(पृष्ठ ७ वरून) निरनिराळे प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडतात. परंतु त्यांच्याशी तो हसतखेळत संवाद साधत असतो. मनमोकळ्या स्वभावामुळे तिथल्या त्याच्या काही आठवड्यांच्या वास्तव्यात तो बराच लोकप्रिय होतो. मोना आणि डॅरलचा साखरपुडा होण्याआधी काही कारणाने मी मुंबईला गेलो होतो. जाताना शीलाने डॅरलची जन्मवेळ देऊन मला त्याची पत्रिका करायला सांगितले. तसेच मोनाची पत्रिका देऊन त्याच ज्योतिषाकडे त्या दोघांचे किती गुण जमतात त्यासंबंधी चौकशी करायला सुचविले. त्यांचे लग्न अजून ठरलेले नसल्याने व गाजावाजा होऊ नये ह्या उद्देशाने पत्रिका करून घेताना मी डॅरलचे ‘धीरज’ असे नामांतरण केले होते. त्या दोघांच्या पत्रिकेतील किती गुण जमले ते आता आठवत नाहीत. परंतु त्यांची मते जुळली हे मात्र निश्चित! माझी आई खेडेगांवात वाढलेली असल्याने तिला इंग्रजीचा गंध नव्हता त्यामुळे ती डॅरलच्या अनुपस्थितीत त्याचा उल्लेख ‘डॉलर’ म्हणून करीत असे. माझ्या आठवणीप्रमाणे, हिंदू लग्नाच्या धार्मिक विधीत गोडसे गुरूजी मोनाला ‘लक्ष्मी’ तर डॅरलला ‘नारायण किंवा विष्णू’ म्हणून संबोधत होते. मात्र गेली १२ वर्षे डॅरल आहे आमचा जावईबापू!

**सुधीर कुलकर्णी** , लेथम, न्यू यॉर्क
*sudhirk18@hotmail.com*

**टिप:** १. पूर्वीच्या अंकात वाचकांना केलेल्या आवाहनांस सुधीर कुलकर्णींनी दिलेल्या प्रतिसादाप्रमाणेच अन्य वाचकांकडून यापुढेही–अमराठी/अमेरिकन सून, जावई, अमेरिकन विहीण/व्याही अशा नातेसंबंधातून आपणास आलेले गोड, कटू, विनोदी अनुभव, कराव्या लागणाऱ्या तडजोडी–अशा विषयावर लेख, कविता मागवत आहोत. (शब्द मर्यादा: ६०० शब्द)

२. सरणारे वर्ष, तसेच नवीन वर्षाचे स्वागत या विषयावर आपले लेख, कविता पाठवाव्यात. (शब्द मर्यादा: ६०० शब्द)

**अंकासाठी साहित्य पाठविण्याचा पत्ता: कृपया पृष्ठ ३ वर पहा.**

***

# ईश्वराचे कोडे

म्हणे ‘वनसृष्टी’ ईश्वराला
केलास तूं दुजा भाव
देवूनी वाचा अन्
चाल ‘जीवसृष्टीला ’ ।
हंसला ईश्वर मनांत अपुल्या
म्हणे तो ‘वनसृष्टीला’
पस्तावलो मी वाटते मला
देऊन ते ‘जीवसृष्टीला’ ।
एका बीजापोटी तरुं कोटी
जन्म घेती सुमनें फळें
परी वाचाळ होऊनी
केली ‘मानवाने’ सदैव भांडणें
दूर जाउनी विसरला
हा ‘मानव’ अपुली मुळें ॥

**श्रीकृष्ण सामंत** (सॅन होसे, कॅलिफोर्निया)
shrikrishnas@gmail.com

# सप्तसूर

सप्त सुरांच्या किमयेमधूनी
तम उजळीत जाई
संगीताच्या माधूर्याची
ही नव–नवलाई ॥१॥
मध्यमांतील स्वरांमधूनी
घडते देवपूजा
तार–सप्तकांमधून प्रकटते
देवी अष्टभूजा
गीत काव्याचे नाते निगडीत
गात दिशा दाही ॥२॥ ध्रु ॥
नैराश्याच्या जाळीत असतील
जेव्हां उष्णा झळी
आयुष्यांतील अर्थ हरवला
असा बिकट –काळी
आधारचही एकच असतो
सप्त–सुरांचाही ॥३॥ ध्रु ॥
जीर्ण शरीरांतून उमटती
जश्या कधी वेदना
सद्‌गद् होतील, असह्य अथवा
हृदयांतील भावना
वठलेल्या वृक्षास फुटावी
जशी नवी पालवी ॥४॥ ध्रु ॥

**शशिकांत पानट**, लॉस एंजेलिस
*spanat@aol.com*

**जागतिक मराठी अकादमीचे ‘शोध मराठी मनाचा’** संमेलन ४,५ व ६ जानेवारी २००८ मध्ये कला अकादमी, पणजी, गोवा येथे भरत आहे. जगातील मराठी बांधवांनी या संमेलनात सहभागी व्हावे म्हणून हे निमंत्रण! सविस्तर माहितीसाठी संपर्क:
श्री रामदास फुटाणे, अध्यक्ष मोबाईल क्र. ०९८६९३५४२७९
श्री राजीव मंत्री, सरचिटणीस मोबाईल क्र. ०९८६९०७५७८४
इमेल: sahitya@bom7.vsnl.net.in

**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**COMFORTTRVL@YAHOO.COM**

**Most Trusted name in the business for 15 years.**
**We proudly consolidated for :**
1. **Jet-air, Continental, Kuwait, Emirates etc.**
2. **Non Stop AI Flights to Mumbai special fares**
3. **SOTC, COX & Kings, Trafalgar Tours and Cruises**

**Please call: SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**

# एकोऽहं ..

धुरांच्या रेषा हवेत सोडणारी आगीनगाडी अन् आगीनगाडीचे गाणें म्हणण्याचे माझे वय इतिहासात जमा झाले असले तरी रेल्वे प्रवासाचे आकर्षण मात्र कायम आहे. रेल्वेगाडीच्या विशिष्ट तालावर मनाने विविध दिशांकडे पण लौकिक अर्थाने एकाच दिशेने धावणाऱ्या रेल्वेतील जनसमुदायाने मी नेहेमीच अचंबित होते. काही दिवसांपूर्वी टोरांटो ते किंग्स्टन (कॅनडा) असा रेल्वेने प्रवास करीत असतांना वाटेत कुठल्याशा स्थानकावर एक महिला माझ्या डब्यात शेजारी येऊन बसली. आमची नजरानजर झाल्यावर मी हलो म्हणून पुनश्च माझ्या लॅपटॉप–संगणकाच्या पडद्याकडे नजर वळविणार तेव्हढ्यांत कानावर शब्द आले *"Can you speak in Hindi?"* मी हाँ जी! म्हटल्यावर बाईंचा चेहेरा आनंदित झाला. "आप कहाँके?.. बंबईके?" त्यांनी प्रश्न आणि गृहित उत्तरही दिले. आतापर्यंतच्या आयुष्यातील पाच वर्षे मी मुंबईत घालवली होती. 'नरो वा कुंजरो वा' प्रमाणे होय मी मुंबईचीच! असे उत्तर देऊन महानगरी मुंबापुरीशी मी नाते जोडले. थोडावेळ मुंबईच्या गुणदोषांवर आमच्या गप्पा झाल्या. पुढल्या स्थानकावर मला अच्छा करून त्या बाई उतरल्या पण माझ्या मेंदूला एक खाद्य देऊनच!

ऋषीचे कुळ आणि हिरळीचे मूळ शोधू नये म्हणतात. पण सर्वसामान्य व्यक्तीचे कुळ, मूळ, आताचे, पूर्वीचे ठावठिकाण–जमल्यास उघडपणे, न जमल्यास आडमार्गाने जाणून घ्यावें असा बहुदा जागतिक संकेत असावा. तुम्ही कुठल्या? या साध्या प्रश्नास माझ्या तर्कट डोक्यांत अनेक उत्तरें व प्रतिप्रश्न उमटत होते.

जन्माने व दुहेरी नाागरिकत्त्वानुसार मी इंडोकनेडीयन म्हणावे तर पूर्वी शिकागोतही होते मग अमेरिकन का नाही? माझ्यापूर्वीच्या तीन पिढ्या कोणीही कऱ्हाडात राहिले नसूनही पूर्वाश्रमीच्या माझ्या आडनावाप्रमाणे कऱ्हाडे गटात जर माझा समावेश होतो तर मग वडिलांच्या पिढ्या व अजूनही भाऊबंद रत्नांगिरी जिल्ह्यांत असल्यामुळे माझी वर्णी कोकणस्थांतही नको का?

तुम्ही कुठल्या? या प्रश्नावर मनांत प्रतिप्रश्नांनी असा चक्रव्यूह रचलेला असतांनाच, मी मेक्सिकोतून आली असावी असेही एक संशोधनपर विधान माझ्या एका लॅटिन–अमेरिकन विद्यार्थ्याने एकदा मला ऐकविले. कारण *"There is ' La Vinata,' the only Tequila Distillery in the Mexican State of Sinaloa."* 'नाममात्र' का होईना पण मेक्सिकन् *Distillery* आपली आहे हे ऐकून *Tequila* प्यायल्याप्रमाणे मन उल्हसित झाले हे सांगणे नलगे!

तुम्ही कुठल्या? तत्सम प्रश्नाला, तुमच्याच गावची हो! असे राजकारणी उत्तर देण्याचेही प्रयोग मी करून पाहिले. पण त्यामुळे अजूनच प्रश्न निर्माण झाले. आजोळ, शिक्षण, लग्न, प्राध्यापकी/नोकरी, तेव्हापासूनची व आता कुलुपांच्या बंदोबस्तात असलेली हक्काची वास्तू पुण्यांत असूनही काही वर्षे मी मुंबईत होते याची कुणकुण लागतांच पुणेंकर मला दुरावले. आणि मुंबईकरांना माझ्या पाऊलखुणा विदर्भातील पाळण्यांत सापडल्यामुळे त्यांच्याही मते मी परदेशी! त्यामुळे कधी नव्हे ते पुणेकर व मुंबईकर 'सखे शेजारीं' बनून त्यांनी माझे स्थान/घर विदर्भातील उन्हांत निश्चित केले. बेळगाव सीमेवर सलोखा करून निदान संयुक्त महाराष्ट्रात थारा मिळेल असे मला वाटले. पण छे! परवाच एका कार्यक्रम प्रसंगी तुम्ही कुठल्या? या प्रश्नावर, 'आपल्या संयुक्त महाराष्ट्रातीलच हो!' ह्या माझ्या उत्तरावर एका कुलकर्णी मावशींनी माझ्याशी कानडीतूनच संवाद सुरू केला. 'कन्नड बरंगेल्ले'(मला कन्नड भाषा अवगत नाही), आपण इंग्रजीत संवाद करुया का? असे मी म्हंटल्यावर त्यांचा रोष मात्र माझ्या पदरी (सॉरी, दुपट्टयात) पडला.

हल्ली, तुम्ही कुठल्या? या प्रश्नावर 'विश्वची माझे घर' विचाराने प्रेरित होऊन 'जगाच्या पाठीवर'ची असे माझे 'स्वगत' उत्तर असते. ग. दि. माडगूळकरांच्या गीतातील "कोठून आलो ते नच स्मरते" असे भाव माझ्या चेहेऱ्यावर 'प्रगट' होतात. कवि केशवसुतांचे "उगमी विलयी अनंत उरलो" हे शब्द माझ्या 'ह्रुदयात' झंकारतात. आणि भगवत्‌गीतेतील शिकवण स्मरून कोऽहं? .. सोऽहं.. एकोऽहं .. अशी धून मी आळवू लागते.

**डॉ. विनता कुलकर्णी**
*vinata@gmail.com*

# उत्तररंग

Whether to go or not to go to a retirement community in leisure years continues to be a topic of discussion among already retired or nearing retirement people. For most, the decision is not simple. It hinges on the expected lifestyle in retirement, specific personal situation and the mindset, and financial resources and their allocation. On the one hand, life in retirement is a time to worry about managing one's declining physical abilities and health, and the limitations imposed by such decline, while on the other hand, it is also a period in one's life to pursue and enjoy one's passions, hobbies and to "give back" to the society. Does living in a retirement community accentuate the positive and minimize the negative? Is there a retirement community for me?

A group of about 20 people in the Los Angeles, CA area got together in early October for an interactive Seminar: **Retirement Community: GO...or NO?** The facilitators in the seminar were: Vishwas and Pallavi Tadwalkar, Ashok and Manisha Gore, Ashok and Vidya Sapre. The Seminar provided ample opportunity for audience participation. The key attractions of a retirement community are:

- Easy access to a social network and support system, low maintenance living, increased safety and security, opportunities to develop and pursue hobbies and enrich your life, and health care support.
- Individual situations and lifestyle expectations do play a key role in deciding whether, where and when to go to a retirement community.

Detailed information, costs, of several Southern California retirement communities of different types was given at the Seminar. The Seminar participants decided to meet regularly to continue to discuss the topic, and search for a viable retirement community to go to as a group.

**Soft copies of the Seminar presentations are available on request.**

**अशोक सप्रे**
ashok.sapre@verizon.net

# शेवटचे पान

उद्योजकाला मालाला नविन बाजारपेठ कशी मिळवायची किंवा विकत असलेल्या मालाला नविन गिऱ्हाईक कसे निर्माण करावयाचे याची चिंता असते. विक्री नाही तर त्या उद्योजकाचे अस्तित्त्व नाही याची उदाहरणे या भांडवलशाही देशात आपण रोज पहातो. गिऱ्हाईक कसे मिळवावे हे यशस्वी उद्योजकाला बरोबर कळते. पुण्याच्या लक्ष्मी रोडचा कापड बाजार मी लहान होतो तेव्हां मराठी लोकांच्या ताब्यात होता. गुजराती व्यापाऱ्यांनी महिला गिऱ्हाईकांचे 'या वहिनी' असे हसतमुखाने स्वागत करण्यापासून थंडपेये पाजण्यापर्यंत सर्व उपाय योजून पुढील काही वर्षात सर्व लक्ष्मीरोड ताब्यात घेतला. आज अशाच प्रकारची स्पर्धा लक्ष्मी रोडवर सराफी धंद्यात दिसून येत आहे. फरक एवढाच की मराठी सराफ या स्पर्धेत अजिबात मागे पडत नाहीत असे दृष्य आता दिसते.

डिसेंबर महिना उजाडला की पुण्या-मुंबईचे दुकानदार परदेशी गिऱ्हाईकांचे स्वागत करण्यास सज्ज होतात. शास्त्रीय संगीताच्या सीडी निर्माण करणाऱ्या कंपन्या भारतीय व परदेशी गिऱ्हाईकांसाठी डिसेंबर महिन्यात खास सेल जाहीर करतात. पुण्याचा एक प्रसिद्ध दुकानदार मला नेहमी सांगतो की गिऱ्हाईक दुकानाच्या समोरून रस्ता ओलांडताना दिसले की ते इथले का परदेशाचे हे आम्ही लगेच ओळखतो. एकूणच परदेशी गिऱ्हाईकाचा भाव भारतात एकदम वधारला आहे. प्रत्यक्ष भारत-भेटीचे वेळी) व अप्रत्यक्षरित्या (महाजाल - इंटरनेटवरून) त्याला आकर्षित करण्याचे अनेक उपाय उद्योजक योजताना दिसतात. या सर्व योजनांमागचे सूत्र एकच असते. आपण परदेशी वास्तव्य करीत असल्याने अनेक गोष्टींना मुकतो म्हणून ती उणीव भरून काढणे.

काही वर्षापूर्वी वाढदिवस, लग्न समारंभ, सण या निमित्ताने अमेरिकेत बसल्या बसल्या भारतातील मित्रांना, नातेवाईकांना फुलांचे गुच्छ, मिठाई पाठवण्याची सोय उद्योजकांनी सुरू केली. आता गणपती उत्सवात मूर्ती पासून पूजेचे साहित्य, दिवाळीत उटण्यापासून आकाश कंदिल व फराळापर्यंत सर्व गोष्टी अमेरिकेत पाठवण्याची सोय उद्योजक पुरवित आहेत.

१९८९च्या डेट्रॉईट येथील अधिवेशनाच्या निमित्ताने संपादक कै. माधव गडकरी यांनी 'लोकप्रभा' साप्ताहिकाचा खास अमेरिका विशेषांक काढला व उपस्थितांस मोफत वाटला. त्याची महाराष्ट्रात चांगली जाहिरात केली. त्यामुळे त्या साप्ताहिकाची महाराष्ट्रात तर चांगली विक्री झालीच पण अनेक नविन देशी-परदेशी वाचक मिळाले. त्यानंतर अनेक वर्षे 'लोकप्रभा' हे परदेशात उत्तम खप असलेले एक साप्ताहिक होते व आजही मराठीतील ते आघाडीचे साप्ताहिक आहे.

पूर्वी बाराही महिने प्रकाशित होणारी अनेक मराठी मासिके आता बंद पडली आहेत. दिवाळी अंकांचा दर्जा सुद्धा चांगलाच घसरला आहे. त्यातील काही मासिकांचे प्रकाशक सध्या बृ. मंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात एक अधिवेशन विशेषांक काढतात. सिॲटलला तर असे दोन अंक निघाले. अमेरिकेतील मराठी व्यक्तींचे परिचय या पलिकडे या अंकात काही नसले तरिही महाराष्ट्रात या मासिकांचा खप चांगला असतो असे ऐकून आहे.

पुस्तक प्रकाशक बृ. मंडळाची अधिवेशने व इतर निमित्ताने अमेरिकेत पुस्तक प्रदर्शने भरवू लागले. गेली काही वर्षे भारतातून पुस्तके पाठवण्याचा खर्च वाढत गेल्याने हा उद्योग सध्या तोट्यात जात आहे असे प्रकाशक सांगतात. तरीसुद्धा खचून न जाता एक वेगळा मार्ग प्रकाशकांना सापडला आहे तो म्हणजे परदेशी लेखकांची पुस्तके प्रकाशित करणे. परदेशी लेखक पुस्तक छपाईचा सुरवातीचा खर्च करण्यापासून पुस्तक विक्रीस परदेशी हातभार लावण्यापर्यंत अनेक प्रकारे प्रकाशकाच्या उपयोगी पडतो. त्यामुळे महाराष्ट्रात पुस्तक खपले न खपले तरी प्रकाशकाला त्याची झळ पोचत नाही. त्याबरोबर बऱ्याच वेळा महाराष्ट्र सरकार मराठी साहित्याचा प्रसार होतो म्हणून प्रकाशकांना अनुदान देतात. काही परदेशी लेखकांच्या पुस्तकांची महाराष्ट्रातील विक्रीही चांगली असते. येथील अनुभवांमुळे लेखकाने निराळा विषय हाताळलेला असतो. त्याचाही विक्रीस फायदा होतो.

दसऱ्याचे सीमोल्लंघन असे संबोधत महाराष्ट्र टाईम्स या दैनिकाने NRM (Non resident Marathi) हा उपक्रम चालू केला या बातमीचे मला अजिबात आश्चर्य वाटले नाही. गेली अनेक वर्षे महाजालावरील मराठी वृत्तपत्र असंख्य परदेशी लोक न चुकता वाचत आहेत हे या दैनिकांनी ओळखले आहे. महाजालावर वाचकांची जेवढी जास्त वेळा भेट तेवढे महाजालावरील जाहीरातींचे उत्पन्न चांगले असे समीकरण असल्याने या वाचकांना आकर्षित करण्यासाठी अनेक युक्त्या योजल्या जातात. दै. सकाळने हा ग्राहक प्रथम हेरला व 'पैलतीर' हे सदर सुरू केले. परदेशातील मराठी व्यक्ती, संस्था यांच्या बातम्या देणे, कार्यक्रमाचे वृत्त प्रसिद्ध करणे अशी या सदरांची रचना असते. या बातम्या मिळविण्यासाठी पगारी प्रतिनिधीची जरूरी नसते अथवा छायाचित्रकार पाठवावा लागत नाही.

दिवाळीत महाराष्ट्रातील हे उद्योजक लक्ष्मीपूजनाचे दिवशी परदेशातील मराठी समाजाचे विशेष आभार मानत असतील याबद्दल मला अजिबात शंका नाही.

**मोहन रानडे**

*boabmm@yahoo.com*

* * * *

## क्षमस्व !

ऑक्टोबर अंकातील विदुला मुणगेकर यांचा - व्यक्ती परिचय श्री विनय देसाई (न्यू जर्सी) यांनी लिहीला. मधुवंती भाट यांनी तो लेख लिहीला नसून त्यांनी तो लेख *Typeset* केला.

## INSURANCE & REAL ESTATE

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**
Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: sjthakur@bellsouth.net

## HEALTH INSURANCE

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

- **VISITORS**
- **H-1 B VISA HOLDERS**
- **PERMANENT RESIDENTS**


**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939
Fax : (706)860-7268
E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com

**JTI**

Crude oil and gas production in the US, India, and Colombia, South America



Joshi Technologies International, Inc.
5801 E. 41st Street, Suite 603
Tulsa, Oklahoma 74135

918.665.6419 ◇ jti@joshitech.com

www.joshioilandgas.com

## SAVE DISABLED CHILDREN THRU FREE PLASTIC SURGERY






**PLEASE DONATE GENEROUSLY TO DR. DICKSHEET'S INDIA PROJECT**
**WWW.DRDICKSHEET.ORG**

**135 OCEAN PARKWAY 17C**
**BROOKLYN, NY 11218**
**PH. 718 633 1449 or 727 868 1667**
**E mail: murphy.pianoman@att.net**

*YOUR DONATION OF $150 CAN SAVE ONE CHILD*





बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-800-300-6430 to pay by credit card. Master Card, Visa, American Express and Discover is accepted.*

